Rayat Shikshan Sanstha's
Dahiwadi College Dahiwadi
Tal Man dist Satara
College News Clipping
Year 2022-23

ऐक्य



यशस्वी विद्यार्थ्यांन समवेत नवनाथ भिसे. (विशाल गुरव)

# जिल्हास्तरीय स्पर्धेत दहिवडी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश

▲ **आंधळी,** दि. ३१ : क्रीडा व युवक सेवा संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा व सातारा जिल्हा अष्टे डू मर्दानी आखाडा यांच्या वतीने सातारा जिल्हास्तरीय शालेय अष्टे डू मर्दानी आखाडा स्पर्धा खंडाळा येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये हस्तकला व शिवकला या खेळ प्रकारामध्ये दहिवडी कॉलेज दहिवडी मधील एकूण नऊ विद्यार्थ्यांनी आपला जलवा दाखवत गोल्ड आणि सिल्व्हर मेडलची कमाई केली.

यामध्ये स्नेहल अवघडे (गोल्ड मेडल), वैष्णवी भोसले (गोल्ड मेडल), साक्षी गोसावी (गोल्ड मेडल), प्रणाली कुंभार गोल्ड मेडल, दीक्षा जाधव(गोल्ड मेडल), ओंकार वसव (गोल्ड मेडल), चैतन्य कुंभार (गोल्ड मेडल) या विद्यार्थ्यांनी हस्तकला प्रकारात सुवर्णपदक पटकावले. शिवकला या प्रकारात या विद्यार्थ्यांने सुवर्णपदक मिळवले. या सर्व विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली असून या स्पर्धेसाठी दहिवडी कॉलेजचे प्राचार्य साळुंखे, उपप्राचार्य बरकडे, क्रीडा प्रशिक्षक जाधव यांनी विद्यार्थी व प्रशिक्षक नवनाथ भिसे यांचे अभिनंदन केले.

Sanket Times Main Edition
Feb 1, 2023 Page No. 9
Powered by : erelego.com
DainikAikya :https://www.DainikAikya.com

सकाळ

# ओम जाधव अध्यक्ष, समर्थ आटपाडकर उपाध्यक्ष

## दहिवडी कॉलेजमध्ये यिन निवडणुकीचा निकाल; विजयी उमेदवारांसह विद्यार्थ्यांकडून जल्लोष

YIN Leadership Development Program Ministry

**दहिवडी, ता. २ :** 'सकाळ'च्या 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'च्या (यिन) महाविद्यालयीन निवडणूक आज खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. एकतर्फी झालेल्या लढतीत दहिवडी कॉलेज दहिवडी या महाविद्यालयाच्या यिन अध्यक्षपदी ओम जालिंदर जाधव, उपाध्यक्षपदी समर्थ बापू आटपाडकर हे उमेदवार निवडून आले. निकालानंतर विजयी उमेदवार व विद्यार्थ्यांनी फटाक्याची आतषबाजी व गुलालाची उधळण करत जल्लोष केला.



**दहिवडी : यिन निवडणुकीच्या निकालानंतर गुरुवारी जल्लोष करताना विजयी उमेदवार व विद्यार्थी.**

यिनच्या वतीने नेतृत्व विकास कार्यक्रम अर्थात निवडणूक व मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणूक प्रक्रियेत महाविद्यालयीन तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात दहिवडी कॉलेज दहिवडी येथे मतदान झाले. निवडणुकीच्या रिंगणात किरण खाडे, संकेत तोरसकर, प्रियांका तोरसे, समर्थ आटपाडकर व ओम जाधव होते.

निवडणुकीची मतमोजणी उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या समोर महाविद्यालयात पार पडली. या वेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, उपप्राचार्य अंकुश बरकडे, प्रा. दत्तात्रेय मांजरे व इतर शिक्षकांचे सहकार्य लाभले. निवडणूक जिल्हा यिन अधिकारी अजिंक्य शेवाळे, 'सकाळ'चे बातमीदार रूपेश कदम, विशाल गुरव, उमेश बुधावले, नवनाथ भिसे, 'यिन'चे अभय मोरे यांच्या उपस्थितीत पार पडली.

Satara, Main
03/02/2023 Page No. 2

ऐक्य

# श्रम संस्कार शिबिर व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन : धर्मेंद्र पवार

▲ **आंधळी,** दि. ६ : राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रम संस्कार शिबिर व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन असल्याचे प्रतिपादन अमृतवेल मीडियाचे अध्यक्ष धर्मेंद्र पवार यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या किरकसाल येथे आयोजित विशेष श्रम संस्कार शिबिराच्या उद्‍घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, सरपंच स्वाती चव्हाण, उपसरपंच सारिका काटकर, माजी सरपंच अमोल काटकर, सौ. शकुंतला काटकर, उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, डॉ. ए. एन. दडस, तात्यासाहेब कट्टे, राजाराम काटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पवार म्हणाले, पदवी शिक्षणाचा कालावधी हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारा असतो, महाविद्यालयीन काळात अभ्यासक्रमपूरक कृती कार्यक्रमांमधील सहभाग हा जीवनाच्या यशस्वी वाटचालीसाठी उपयुक्त ठरतो. आर्थिक साक्षरता ही काळाची गरज असून त्यासाठी प्रत्येकाने सजग राहिले पाहिजे. बौध्दिक विकासासाठी विद्यार्थ्यांची चौकस बुद्धी विकसित झाली पाहिजे. प्राचार्य डॉ. साळुंखे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास होतो. श्रम संस्काराबरोबरच सामाजिक कार्याची आवड निर्माण होते. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात.

माजी सरपंच अमोल काटकर यांनी ग्रामविकासाच्या संयुक्त राष्ट्रांच्या नऊ उद्दिष्टांवर भाष्य केले. प्रा. के. एस. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. इंद्रजीत अहिवळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. हनुमंत कायंदे यांनी आभार मानले.

# दहिवडी कॉलेजचे सात विद्यार्थी सैन्य दलात

**दहिवडी, ता. ९ :** रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजमधील राष्ट्रीय छात्र सेनेतील सात विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे.

भारतीय सैन्य दलासाठी कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या निवड प्रक्रियेत दहिवडी कॉलेजमधील रणजित बरकडे व वैभव काटे यांची अग्निवीर (टेक्निकल), तर तुषार जाधव, अनिकेत तावरे, प्रवीण मदने, सूरज जानकर व मयूर माने यांची अग्निवीर (जनरल ड्यूटी) या पदासाठी निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्र सेनेचे मुख्य प्रशिक्षण अधिकारी डॉ. शिवशंकर लेकुरवाळे, डॉ. सर्जेराव चिले यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख, जनरल बॉडी सदस्या नीलिमा पोळ, डॉ. प्रदीपकुमार शिंदे, प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत, उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. ए. एन. दडस, कार्यालय अधीक्षक केशव औटी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले.

Satara, Satara-Today
10/02/2023 Page No. 3

ऐक्य




संपास बसलेले दहिवडी कॉलेजमधील शिक्षक व कर्मचारी.
(विशाल गुरव)

# दहिवडी कॉलेजमधील कर्मचारी व शिक्षकांचा राज्यव्यापी संपास पाठिंबा

▲ **आंधळी,** दि. २० : महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या निर्देशानुसार राज्यातील महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय व रास्त

**राज्यव्यापी आंदोलनातील प्रमुख मागण्या....**

पदोन्नती देण्यात यावी. रिक्त पदांवर नवीन कर्मचारी भरती करावी. १ जाने. २०१६ पासून लागू असलेल्या सातव्या वेतन आयोगाची रक्कम फरकासह मिळावी. आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या आहेत.

मागण्यांच्या पूर्ततेसाठी २ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या बेमुदत संपाचा पाचवा टप्पा आजपासून सुरू झाला असून या संपास दहिवडी कॉलेजचे कार्यालयीन कर्मचारी व शिक्षकांचा पाठिंबा आहे.

या संपास शिक्षक व कार्यालयीन अधीक्षक के. बी. आवटे, व्ही. एम. काळे, आर. बी. गायकवाड, उपप्राचार्य ए. जे.बरकडे, प्रा. के. एस. शिंदे, प्रा. अनिल दडस, प्रा. मांजरे, महाविद्यालयातील सर्व कर्मचारी शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक व सुटा संघटना, दहिवडी युनिटने पाठिंबा दर्शवला आहे.

Sanket Times Main Edition
Feb 21, 2023 Page No. 7

दैनिक मुक्तागिरी



# दहिवडी कॉलेजमधील शिक्षकेत्तर कर्मचारी बेमुदत संपावर

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**दहिवडी दि. २० :** महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या निर्देशानुसार राज्यातील महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय व रास्त मागण्यांच्या पूर्ततेसाठी दि.२ फेब्रुवारी पासून सुरू असलेल्या राज्यव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आज दि.२० प्रवेशद्वारवर धरणे आंदोलन केले.

यावेळी महाविद्यालयातील कार्यालय अधीक्षक श्री.केशव औटे,महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीचे युनिट प्रमुख श्री. खाडे पाटील के.सी. व सर्व प्रशासकीय कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले होते.

या आंदोलनास सुटा संघटनेने

सकाळ

# प्रा. नीलेश म्हेत्रे यांना पीएचडी



**दहिवडी :** येथील दहिवडी कॉलेजमधील प्रा. नीलेश मधुकर म्हेत्रे यांना औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने अर्थशास्त्र विषयात पीएचडी जाहीर केली आहे. प्रा. म्हेत्रे यांनी डॉ. डी. व्ही. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'फ्लो ऑफ फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट इन इंडिया अँड चीन अ कम्पॅरेटिव्ह ॲनॅलिसिस' (१९९१ ते २०१५) या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला होता. प्रा. म्हेत्रे यांचे रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीचे सदस्य प्रभाकर देशमुख, प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

Satara, Main
24/02/2023 Page No. 3

दैनिक
सातारा न्यूज
निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ
संपादकः श्री.प्रकाश शिंदे

# दहिवडीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने स्वच्छता मोहीम

**सातारा न्यूज;**
**दहिवडी :** दहिवडी कॉलेज दहिवडी व नगरपंचायतीच्या विद्यमाने दहिवडी शहरांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आली यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

यावेळी विद्यार्थ्यांनी दहिवडी बस स्थानक ते रिलायन्स पेट्रोल पंपापर्यंत स्वच्छता केली. या स्वच्छता मोहिमेमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसह



दहिवडी नगरपंचायतीचे प्रतीक कर्वे दहिवडी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.ए.जे. बरकडे,आयक्यूएसी समन्वयक प्रा.डॉ.ए. एन.दडस,रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.के.एस. शिंदे, प्रा.एच.जी.कायंदे यांच्यासह इतर प्राध्यापक सहभागी झाले होते.

Feb 25, 2023 Page No. 3
Powered By timinfotech.com

पुण्य नगरी

# प्रा. निलेश म्हेत्रे यांना पी.एच.डी.

**बिदाल / प्रतिनिधी**

दहिवडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजमधील प्रा. निलेश मधुकर म्हेत्रे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी अर्थशास्त्र विषयातून पीएच.डी. नुकतीच जाहीर केली. प्रा. म्हेत्रे यांनी डॉ. डी.व्ही. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली



फ्लो ऑफ फॉरेन डायरेक्ट इन्व्हेसमेंट इन इंडिया अँड चीन अ कम्पॅरिटिव्ह अॅनॅलिसीस (१९९१ ते २०१५) या विषयावर संशोधन करून शोधप्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने बहिस्थ परीक्षकांसमवेत, ऑनलाइन मौखिक परीक्षेत उत्तम सादरीकरणानंतर प्रा. म्हेत्रे यांना पीएच.डी. पदवी जाहीर केली.

पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल प्रा. म्हेत्रे यांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख, जनरल बॉडी सदस्य निलिमा पोळ, डॉ प्रदीपकुमार शिंदे, प्राचार्य डॉ. एस.टी. साळुंखे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत, उपप्राचार्य डॉ. ए.जे.बरकडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. ए. एन दडस, डॉ. सर्जेराव चिले, डॉ शिवशंकर लेकुरवाळे, कार्यालय अधिक्षक केशव औटे, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी अभिनंदन केले.

Satara Edition
Feb 25, 2023 Page No. 05
Powered by : eReleGo.com

# विद्यार्थ्यांनी संविधानिक मुल्ये रुजवावीत : खा. पाटील

**कराड, दि. ७ (प्रतिनिधी)** - विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडवताना स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी. तसेच त्यांनी संविधानिक मुल्ये रुजवावीत, असे आवाहन खा. श्रीनिवास पाटील यांनी केले.

छ. शिवाजी कॉलेज, सातारा व दहिवडी कॉलेज, दहिवडी या दोन्ही महाविद्यालयांच्यावतीने खा. श्रीनिवास पाटील यांच्या कार्यालयास अभ्यास दौरा आयोजित केला होता. यावेळी खा. श्रीनिवास पाटील यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

खा. श्रीनिवास पाटील म्हणाले, राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची विशेष जबाबदारी असते. नागरिक म्हणून वावरत असताना आपण संविधानातील मूलभूत कर्तव्य आणि आपल्या जबाबदाऱ्या सांभाळून देशोन्नतीच्या कार्यात सहभागी व्हावे, असे सांगून स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नीतिमत्ता व मूलतत्वादी राजकारणाच्या संकल्पना विस्तृतपणे समजावून सांगितल्या.

या अभ्यास भेटीत विद्यार्थ्यांना खा. श्रीनिवास पाटील यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. दरम्यान. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील प्रश्न व शंकांचे निरसन करून घेतले. याप्रसंगी श्रीनिवास पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष सारंग पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लोकसभा मतदारसंघ त्यातील कामकाज व संसदीय प्रक्रियांवर विस्तृत मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. शिवाजीराव पाटील, डॉ. नीलकंठ लोखंडे, प्रा. भक्ती पाटील, प्रा. आरती लोंढे, प्रा. मांजरे, यशवंत माने यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



**कराड : खा. श्रीनिवास पाटील यांच्या कार्यालयास अभ्यास दौरा भेटीप्रसंगी विद्यार्थी व शिक्षक.**

प्रभात
Satara, 08 Mar 2023, Page:008
https://epaper.dainikprabhat.com

8 -3-2023page2
08 Mar 2023

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्य रुजवावीत : खा. श्रीनिवास पाटील

**महाराष्ट्र न्यूज**

**कराड, दि. ८ मार्च :** विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडवताना स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी. असे मार्गदर्शन खा.श्रीनिवास पाटील यांनी केले.

छ. शिवाजी कॉलेज, सातारा व दहिवडी कॉलेज, दहिवडी या दोन्ही महाविद्यालयांच्या वतीने खा. श्रीनिवास पाटील यांच्या कार्यालयास भेट देत अभ्यास दौरा आयोजित केला होता. यावेळी बोलताना खा.श्रीनिवास पाटील यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.



खा. श्रीनिवास पाटील म्हणाले, राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची विशेष जबाबदारी असते. नागरिक म्हणून वावरत असताना आपण संविधानातील मूलभूत कर्तव्य आणि आपल्या जबाबदाऱ्या सांभाळून देशोन्नतीच्या कार्यात सहभागी व्हावे असे सांगून स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या नीतिमत्ता व मूलतत्वादी राजकारणाच्या संकल्पना विस्तृतपणे समजावून सांगितल्या.

या अभ्यास भेटीत विद्यार्थ्यांना खा.श्रीनिवास पाटील यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.

दरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील प्रश्न व शंकांचे निरसन करून घेतले. याप्रसंगी श्रीनिवास पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष सारंग पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लोकसभा मतदारसंघ त्यातील कामकाज व संसदीय प्रक्रियांवर विस्तृत मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ.शिवाजीराव पाटील, डॉ. नीलकंठ लोखंडे, प्रा. भक्ती पाटील, प्रा. आरती लोंढे, प्रा. मांजरे, यशवंत माने यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

page 2,14-03-2023
14 Mar 2023

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# महिलांनी जबरदस्तीला बळी न पडता आत्मविश्वासाने प्रगती साधावी : डॉ. भारती पाटील

**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**दहिवडी, दि.१३ मार्च** : महिलांनी कोणत्याही प्रकारच्या जुलूम, जबरदस्तीला बळी न पडता स्वावलंबनातून सर्वांगीण प्रगती साधावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले.दहिवडी थील दहिवडी कॉलेजच्या राज्यशास्त्र विभाग, सांस्कृतिक विभाग व शारदाबाई पवार अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पाटील बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.टी. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, डॉ. ए. एन. दडस यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाल्या, आपण सर्वांनी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे, लिंगभाव समानता ही काळाची गरज असून महिला सक्षमीकरणासाठी सामाजिक प्रबोधनासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. समाज सुधारकांच्या विचार व



कृतींमधून प्रेरणा घेऊन पुरोगामी विचार आत्मसात केले पाहिजेत.यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे म्हणाले, सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात सर्व अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध आहेत. प्रत्येकाने बौध्दिक, मानसिक व शारीरिक प्रगती साध्य करून स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भक्ती पाटील यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्रा. ए.ए. कोपार्डे यांनी केले.

यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक सातारा न्यूज
निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ
संपादकः श्री.प्रकाश शिंदे

# महिलांनी जबरदस्तीला बळी न पडता आत्मविश्वासाने प्रगती साधावी : डॉ. भारती पाटील

**सातारा न्यूज;**
**आंधळी :** महिलांनी कोणत्याही प्रकारच्या जुलूम, जबरदस्तीला बळी न पडता स्वावलंबनातून सर्वांगीण प्रगती साधावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले.

येथील दहिवडी कॉलेजच्या राज्यशास्त्र विभाग, सांस्कृतिक विभाग व शारदाबाई पवार अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित




व्याख्यान कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पाटील बोलत होत्या.

यावेळी कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.टी. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, उपप्राचार्या नंदिनी साळुंखे, डॉ. ए. एन. दडस यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाल्या, आपण सर्वांनी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे, लिंगभाव समानता ही काळाची गरज असून महिला सक्षमीकरणासाठी सामाजिक प्रबोधनासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. समाज सुधारकांच्या विचार व कृतींमधून प्रेरणा घेऊन पुरोगामी विचार आत्मसात केले पाहिजेत.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे म्हणाले, सर्व विद्यार्थी, विद्यार्थींनी यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात सर्व अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध आहेत. प्रत्येकाने बौध्दिक, मानसिक व शारीरिक प्रगती साध्य करून स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भक्ती पाटील यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी केले. तर आभार प्रा. ए.ए. कोपार्डे यांनी मानले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Mar 15, 2023 Page No. 2
Powered By timinfotech.com

सकाळ



यवतमाळ : बॉल बॅडमिंटन स्पर्धेतील विजेता दहिवडी कॉलेजचा संघ मान्यवरांच्या हस्ते चषक स्वीकारताना.

# बॉल बॅडमिंटन स्पर्धेत दहिवडी कॉलेज विजेते

**दहिवडी, ता. ३१ :** यवतमाळ येथे झालेल्या १९ वर्षांखालील मुलींच्या राज्यस्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत दहिवडी कॉलेजच्या संघाने विजेतेपद पटकावले.

स्पर्धेसाठी कोल्हापूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नाशिक, लातूर, मुंबई व नागपूर अशा एकूण ८ विभागातून एकूण १५ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेत दहिवडी कॉलेज दहिवडीच्या मुलींच्या संघाने कोल्हापूर विभागाचे प्रतिनिधित्व करत उत्तम कौशल्याचे प्रदर्शन केले. दहिवडी

संभाजीनगर संघावर ३५-२५, ३५-१८, तर उपांत्य फेरीत अमरावती संघावर ३५-२२, ३५-२१ गुणांनी विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. अटीतटीच्या अंतिम लढतीत दहिवडी कॉलेजने पुणे संघाचा ३५-२५, ३५-३१ असा पराभव करत विजेतेपद मिळवले. प्रशिक्षक अमर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या संघात कर्णधार शीतल निवृत्ती काटकर, सोनम महेश जाधव, दिशा भरत शिंदे, काजल केदारी कुंभार, ऋतुजा शामराव ओंबसे, नम्रता ताराचंद गायकवाड व आदिती नानासाहेब गायकवाड यांचा

सकाळ

# दहिवडी कॉलेजमध्ये आज क्रीडा महोत्सवाचे आयोजन

**दहिवडी, ता. १९ :** येथील दहिवडी कॉलेजमध्ये उद्यापासून (गुरुवार) कॉलेजच्या पदवी व पदव्युत्तर वर्गांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केल्याची माहिती प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी दिली.

क्रीडा महोत्सवाच्या उद्या मॅरेथॉन स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा व फनी गेम्स, तर शुक्रवारी (ता. २१) व्हॉलिबॉल, कबड्डी, बॅडमिंटन, टेबल टेनिस, रस्सीखेच, खो-खो या क्रीडा प्रकारातील स्पर्धा आयोजित केल्या आहेत. यावर्षीच्या मॅरेथॉनचे ''रन टू युनाइट, नॉट टू डिव्हाईड'' हे घोष वाक्य आहे.

Satara, Satara-Today
20/04/2023 Page No. 4

सकाळ

# ‘रयत’ने स्मार्ट गर्ल कार्यक्रम राबवावा

## अनुराधा देशमुख; बीजेएस व ड्रीम सोशल फाउंडेशनतर्फे दहिवडीत कार्यक्रम

**दहिवडी, ता. २७ :** विद्यार्थिनींचं व्यक्तिमत्त्व विकसित करून त्यांचा आत्मविश्वास वाढविणारा ‘स्मार्ट गर्ल’ हा कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेने त्यांच्या सर्व विद्यालये व महाविद्यालयांमध्ये राबवावा, असे प्रतिपादन अनुराधा देशमुख यांनी केले.

बीजेएस व ड्रीम सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दहिवडी कॉलेजच्या ज्युनिअर विभागातील विद्यार्थिनींसाठी आयोजित ‘स्मार्ट गर्ल प्रोग्रॅम’ समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी राष्ट्रवादी महिला आघाडीच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष कविता म्हेत्रे, भरतेश गांधी, नंदकुमार



**दहिवडी : ‘स्मार्ट गर्ल प्रोग्रॅम’च्या समारोपप्रसंगी अनुराधा देशमुख, कविता म्हेत्रे, डॉ. सुरेश साळुंखे आदी. (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)**

खोत, उपप्राचार्या नंदिनी साळुंखे आदी उपस्थित होते.

अनुराधा देशमुख म्हणाल्या, ‘‘विद्यार्थिनींना स्मार्ट गर्ल प्रोग्रॅममधून जीवनात कसे जगावे, आत्मसन्मान कसा जपावा, स्वतःला कसे ओळखावे, संवाद आणि नातेसंबंध कसे दृढ करावेत, याचे प्रशिक्षण देण्यात येते. सुशिक्षित मुलींही लग्नानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यासाठी या वयात मुलींना अशा प्रकारच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. या उपक्रमातून विद्यार्थिनींत शिस्त निर्माण होईल. व त्या उत्कृष्टपणे यश मिळवू शकतील, असे नंदिनी साळुंखे यांनी सांगितले.

राज्य प्रशिक्षक रत्नाकर महाजन, माजी मुख्याध्यापक रेखा पवार यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य डॉ. अंकुश बरकडे, प्रा. ढमाळ, प्रा. मिरा देठे, प्रा. एन. एस. गवाळे यांनी परिश्रम घेतले.

Satara, Satara-Today
28/04/2023 Page No. 3

page 4,7-05-2023
07 May 2023

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# कर्मवीर अण्णा म्हणजे शाहू महाराजांनी घडवलेले एक शिक्षणतज्ञ : डॉ.एन.डी.लोखंडे

## दहिवडी कॉलेजमध्ये स्मृतिदिनी शाहूंच्या कार्याला अभिवादन




**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**दहिवडी, दि. ६ मे :** कर्मवीर अण्णा म्हणजे शाहू महाराजांच्या तालमीत तयार झालेले शिक्षणतज्ञ होत,असे प्रतिपादन थोर लेखक व वक्ते डॉ.एन. डी. लोखंडे यांनी केले. राजर्षी शाहू स्मृती दिन व कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी बोलताना त्यांनी शाहू महाराज यांच्या व कर्मवीर अण्णा यांच्या असणाऱ्या नात्याबदल त्यांच्यातील जिव्हाळ्याबाबत विस्तृत विवेचन केले. महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महापुरुषांच्या कार्याचा लेखाजोखा मांडला गेला तर येणाऱ्या काळ कमी पडेल. कारण त्यांनी केलेले कार्य यांचे सप्ताह जरी आयोजित केले. तरी त्यांचे आभाळाएवढे कार्य लवकर उलगडणार नाही. त्यासाठी त्यांना अभ्यासत त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरजही त्यांनी यावेळी बोलून दाखवली. शाहू महाराजांचे जीवन कार्य व समाजकार्य यांचा आढावा घेताना शाहूंच्या विविध पैलूंना त्यांनी खोलवर स्पर्श केला.

अध्यक्षीय मनोगतातून उपप्राचार्य डॉ.ए. जे. बरकडे यांनी शाहू महाराज यांच्या कार्याला वंदन करत विद्यापीठ आणि शासनाकडून शाहू महाराजांच्या नावाने राबवण्यात येणाऱ्या योजना,विविध सुविधा यांची माहिती दिली.

यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए. एन. दडस, डॉ.कांबळे, प्रा. शिंदे, यांच्यासह वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.भक्ती पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. मांजरे यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. घाडगे यांनी केले.

ऐक्य

आविरात करण्यात आले.        मंजुषा साळुंखे, शरद सावंत मादना मुलाणी



दहिवडी कॉलेजमध्ये व्यापार मेळाव्यास उपस्थित असलेले मान्यवर.

# दहिवडी कॉलेजमध्ये व्यापार मेळाव्यास प्रतिसाद

## विद्यार्थ्यांनी घेतला व्यावसायिक ज्ञानाचा अनुभव

▲ आंधळी, दि. १५ : दहिवडी कॉलेजच्या बी. कॉम. व बँक मॅनेजमेंट विभागाच्यावतीने घेण्यात आलेल्या व्यापार मेळाव्यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त मिळाला. मेळाव्याचे उद्‌घाटन दहिवडीतील प्रसिद्ध उद्योजक दिनेश दवे, प्राचार्य एस. टी.साळुंखे, उपप्राचार्य ए. जे. बरकडे, विभाग प्रमुख एस. एस. चिले, कार्यक्रम आयोजक एस.के. कदम, ए. एन.दडस, पत्रकार रुपेश कदम यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या व्यापार मेळाव्यामध्ये कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे ११ स्टॉल लावले होते.

या स्टॉलमधून जवळपास ४० हजारांची व्यवसायिक उलाढाल झाली.

कॉलेजमधील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सहभाग घेत व्यावसायिक ज्ञानाचा अनुभव घेतला.

> विद्यार्थ्यांना कॉलेजमधून बाहेर पडत असताना आपल्या करिअरमध्ये व्यावसायिक ज्ञान व मार्केटिंग क्षेत्राचा अनुभव यावा. तसेच विद्यार्थी आपले करिअर करत असताना तो व्यवसायिक बनला तर त्याला याचे ज्ञान असले पाहिजे या दृष्टिकोनातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एस. के. कदम कार्यक्रमाचे आयोजक होते.

Sanket Times Main Edition
May 16, 2023 Page No. 6
Powered by : erelego.com
DainikAikya :https://www.DainikAikya.com

सकाळ

## डॉ. इंगोले : दहिवडी येथे माणदेशी कविसंमेलन उत्साहात

# मानसिक विकासासाठी कला आवश्यक

**दहिवडी, ता. १४ :** माणसाचा फक्त भौतिक नव्हे, तर मानसिक व सांस्कृतिक विकास गरजेचा असतो. त्यासाठी विविध ललितकला महत्त्वाच्या ठरतात. माणूस घडविण्याचं अतिशय कठीण काम साहित्यिक करतात, असे मत प्राचार्य डॉ. कृष्णा इंगोले यांनी मांडले.

रामकृष्ण मेडिकल फाउंडेशन व दहिवडी कॉलेज दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माणदेशी कविसंमेलन व साहित्य कट्टा या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी डॉ. मारुती काटकर, हर्षदा देशमुख-जाधव, सुहास पवार, प्राचार्य एस. टी. साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते.

हर्षदा देशमुख-जाधव म्हणाल्या, ''माणदेशी साहित्य आणि संस्कृती हा एक मोठा विषय आहे. साहित्याच्या माध्यमातून समाज घडविणारे विचार तळागाळापर्यंत पोचवता येतात. सर्जनशीलता हरवलेल्या आजच्या पिढीला अशा साहित्य कट्ट्याच्या माध्यमातून संधी देण्याची आवश्यकता आहे.

माणदेशाचे प्रश्न आणि साहित्य या परिसंवादात प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी, सुभाष कवडे व डॉ. मीरा देठे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. सुहास पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात जोतिराम फडतरे व प्रा. सर्जेराव खरात यांनी उत्कृष्ट कथाकथन सादर केले. कविसंमेलनास मोठा प्रतिसाद लाभला. यात माण-खटाव, सांगोला, आटपाडी, जत, खानापूर, पंढरपूर, माळशिरस या भागांतील पन्नासपेक्षा जास्त कवी सहभागी झाले होते. डॉ. मारुती काटकर यांनी प्रास्ताविक केले. वीरधवल शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर जयराम शिंदे यांनी आभार मानले.



**दहिवडी :** माणदेशी कविसंमेलन व साहित्य कट्टा कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. कृष्णा इंगोले, उपस्थित हर्षदा देशमुख-जाधव व मान्यवर.
(रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

### सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान

- या वेळी उत्कृष्ट सामाजिक काम करणाऱ्या डॉ. अभिजित सोनवणे, अश्विनी वेताळ, योगेश जाधव, सविता खांडेकर, डॉ. दीपक हिंडत आदी सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.

Satara, Main
15/05/2023 Page No. 4

सकाळ

# दहिवडी कॉलेजला नॅकमध्ये अ प्लस प्लस

## पुनर्मूल्यांकनात मानांकन; विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्रात अव्वल

**दहिवडी, ता. १५ :** रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेज दहिवडी या महाविद्यालयाने नॅक पुनर्मूल्यांकनात इतिहास घडविला आहे. बंगळूर येथील राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद (नॅक) यांच्याकडून चौथ्या पुनर्मूल्यांकनात अ++ ही सर्वोच्च श्रेणी महाविद्यालयाने मिळवली आहे. महाविद्यालयाने विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्रात अव्वल स्थान पटकावले आहे. ही बातमी कळताच सर्वांच्या आनंदाला उधाण आलं आहे.

१९ व २० मे २०२३ रोजी बंगळूर येथील रेवा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. धनमजया मदिराजू यांच्या अध्यक्षतेखालील लखनौ येथील इंटिग्रल विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. मोहम्मद हरिस सिद्दकी व केरळ येथील सेंट जोसेफ कॉलेज फॉर वूमेन्स या कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. शिना जॉर्ज यांचा समावेश असलेल्या त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयास भेट देऊन मूल्यांकन केले होते. संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही पातळीवरील मूल्यांकनात महाविद्यालयाने सर्वोत्कृष्ट ३.६० हा सीजीपीए (सरासरी श्रेणी पॉईंट) प्राप्त केला. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव प्राचार्य डॉ. ज्ञानदेव मस्के, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख, जनरल बॉडी सदस्या नीलिमा पोळ, डॉ. प्रदीपकुमार शिंदे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत यांनी प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, कार्यालय अधीक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचे अभिनंदन केले.



**दहिवडी : नॅक पुनर्मूल्यांकनात अ++ श्रेणी प्राप्त करणाऱ्या दहिवडी कॉलेज दहिवडीची रमणीय इमारत व परिसर. (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)**

> नॅकची अ++ श्रेणी प्राप्त करण्यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांचे परिश्रम व पालक, हितचिंतक यांच्या लाभलेल्या सहकार्यामुळेच हे यश लाभले आहे.
>
> **- डॉ. सुरेश साळुंखे**, प्राचार्य, दहिवडी कॉलेज दहिवडी.

Satara, Satara-Today
16/06/2023 Page No. 4

सकाळ

# झाडे जगवा, बक्षीस मिळवा

## दहिवडी कॉलेजची 'वृक्ष माझा सखा' योजना

**दहिवडी, ता. १८ :** झाडे जगवा, बक्षीस मिळवा, ही दहिवडी कॉलेजने विद्यार्थ्यांसाठी वृक्ष माझा सखा उपक्रमांतर्गत आकर्षक योजना राबविली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षात वृक्ष लावणे व ते जगवणे यासाठी ही बक्षीस योजना जाहीर करण्यात आली आहे.

नवीन वृक्षलागवड करणे व प्रत्येक महिन्यात त्या वृक्षांची वाढ व स्थिती दाखवणारे अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय स्थान व वेळदर्शक छायाचित्र असणे बंधनकारक आहे. महाविद्यालयाची समिती प्रत्यक्ष पाहणी मार्च २०२३ मध्ये करेल व त्या समितीच्या शिफारशीनुसार पारितोषिके वितरीत करण्यात येणार आहेत. सदर पारितोषिके ही वार्षिक पारितोषिक

> **“ वृक्षसंवर्धन बक्षीस योजनेचे स्वरूप व अटी लक्षात घेऊन इच्छुक विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. विक्रमी संख्येने नवीन वृक्षलागवड व वृक्षांचे उत्कृष्ट संगोपन करून बक्षीस संपादन करावे.**
>
> **- प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे**

वितरण समारंभात दिली जाणार आहेत. वृक्ष रोपे महाविद्यालयामार्फत मोफत पुरविण्यात येणार आहेत. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी विद्यार्थी कल्याण मंडळ समन्वयक प्रा. अरुण कट्टे, प्रा. राहुल सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### ...अशी आहेत बक्षिसे

गट क्र. १ - १०० किंवा १०० पेक्षा जास्त वृक्ष लावणे व ते जगवणे. बक्षिसे अनुक्रमे प्रथम तीन क्रमांकांसाठी रुपये ८०००, रुपये ७००० व रुपये ६०००. गट क्र. २ - ५० किंवा ५० पेक्षा जास्त वृक्ष लावणे व ते

ऐक्य

# दहिवडी कॉलेजमध्ये गरजू विद्यार्थ्यांना दोस्ती फाउंडेशनतर्फे गणवेश वाटप

▲ आंधळी, दि.१६ : माण तालुक्यातील दहिवडी कॉलेजमध्ये गरजू विद्यार्थ्यांना दोस्ती फाउंडेशनतर्फे गणवेश वाटप करण्यात आले.

मलवडी परिसरातील दोस्ती फाउंडेशन व वीस वर्षांपूर्वी वर्गमित्र असणारे माजी विद्यार्थी यांनी पेऊन गरजू विद्यार्थ्यांसाठी काहीतरी चांगला उपक्रम राबवायचा या अनुषंगाने सर्वानुमते गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि दहिवडी कॉलेजमधील शेकडो विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.



विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करताना दोस्ती फाउंडेशन सदस्य व शिक्षक. (विशाल गुरव)

दोस्ती फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील जाधव म्हणाले, आम्ही माजी विद्यार्थी इथून पुढे नेहमीच गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहू. सध्या समाजामध्ये कितीतरी असे विद्यार्थी आहेत की जे खरच होतकरू आणि हुशार आहेत. परंतु परिस्थितीमुळे त्यांना अनेक अडचणी येतात. मात्र अशा विद्यार्थ्यांनी हतबल न होता दोस्ती फाउंडेशनशी संपर्क साधावा. आम्ही त्यांना नक्की मदत करू. त्रिंबकराव काळे विद्यालय, मलवडी येथून दहावीपर्यंत शिक्षण घेऊन महाविद्यालयीन शिक्षणासाठी याच दहिवडी कॉलेजमध्ये आम्ही शिक्षण घेतले. त्यामुळे आम्ही याच कॉलेजचे माजी विद्यार्थी आहोत आणि या कॉलेजने आम्हाला चांगले शिक्षण दिले, चांगले संस्कार देखील घडवले आहेत. आम्ही सर्वजण माजी विद्यार्थी आज चांगल्या पदावर आहोत. चांगले सक्षम देखील आहोत. त्यामुळे होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत करायला आम्ही कधीच कमी पडणार नसल्याचे सुनील जाधव यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित दोस्ती फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष निर्मला मुळीक, खजिनदार रमेश घोरपडे, सदस्य उत्तम जगदाळे, अनिल पाडळे, भगवान मगर, मीना जगताप, सुनीता वाघ, सत्वशीला मगर, उपप्राचार्य बरकडे, प्रा. एम. जे. लुबाळ व शिंदे उपस्थित होते.

Main Edition
Oct 17, 2022 Page No.
Powered by : eReleGo.com

दैनिक मुक्तागिरी

# परिवर्तनशील कार्यासाठी अंतःप्रेरणा महत्त्वाची : डॉ. सोनटक्के

**दहिवडी** : परिवर्तनशील कार्यासाठी अंतःप्रेरणा महत्त्वाची असून वाचन, चिंतनातून व्यक्तीच्या सद्सदविवेक बुद्धीचा विकास झाला पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. देवानंद सोनटक्के यांनी केले. माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जयंती दिन येथील दहिवडी कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रंथालय विभाग, मराठी, हिंदी, इंग्रजी विभागाच्यावतीने आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.टी. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, प्रा. डॉ. के. एम. पवार, डॉ. ए. एन. दडस यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. सोनटक्के म्हणाले, सामान्य परिस्थितीतून देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत पोहचलेल्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र आपणा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. महामानवांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत वाचन, लेखनाचा व्यासंग केला व महान साहित्यकृतींची निर्मिती केली, महापुरुषांच्या जीवनातील प्रसंगांवर भाष्य करताना डॉ. सोनटक्के यांनी समर्पक उदाहरणांद्वारे उपस्थितांना अंतर्मुख केले. वाचनाचे महत्त्व प्रतिपादन करताना त्यांनी वाचनातून सत्यनिष्ठ विचार विश्व निर्माण होते, विविध घटनांच्या समकालीन प्रस्तुततेतून बोध घेता येतो, व्यक्तीमध्ये प्रेरणा आणि चैतन्य निर्माण होते, असे विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल विष्णु वाघेरे यांनी केले, अतिथी परिचय प्रा. डॉ. किशोर पवार यांनी करुन दिला. डॉ. नवनाथ लोखंडे यांनी सुत्रसंचालन केले, तर आभार डॉ. मीरा देठे यांनी मानले.

Oct 18, 2022 Page No. 3
emuktagiri.in
powered by thoughtpad infotech

सकाळ



**दहिवडी : स्पर्धा परीक्षांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्रभाकर देशमुख, डॉ. एस. टी. साळुंखे आदी. (रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)**

# स्पर्धा परीक्षेतील यशस्वितांचा दहिवडी कॉलेज येथे सत्कार

**दहिवडी, ता. २६ :** प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्याची, तिच्यावर जिद्दीने मात करण्याची ताकद माणच्या मातीने दिली आहे. म्हणूनच बुद्धिवंतांची खाण, आपला माण म्हटले, तर वावगे ठरणार नाही, असे प्रतिपादन माजी विभागीय आयुक्त प्रभाकर देशमुख यांनी केले.

दहिवडी कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित स्पर्धा परीक्षांमधील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, नगरपंचायतीचे बांधकाम सभापती महेश जाधव आदी उपस्थित होते.

श्री. देशमुख म्हणाले, ''यशस्वी विद्यार्थ्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन यशाला गवसणी घातली आहे. महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी पुण्या, मुंबईतील सुविधा आम्ही उपलब्ध करून देऊ.''

कोमल सावंतने घरच्यांची माझ्यासाठी लगबग हीच माझ्यासाठी ऊर्जा देणारी ठरल्याचे सांगितले. प्रशांत अवघडे याने स्वतःवर बंधन घातली, शिस्त लावली, कष्ट घेतले अन् त्यानंतर सातत्याने यशाला गवसणी घातल्याचे सांगितले. अनिकेत भुजबळ याने पोशाखी सेवेचे वेड असल्यामुळेच सीमा सुरक्षा दलाच्या सेवेत रुजू झालो. मात्र, या क्षेत्रात प्रगती करून उच्च पद प्राप्त करण्याचे ध्येय असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. व्ही. पी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. एन. डी. लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. बी. व्ही. मोरे यांनी आभार मानले.



Satara, Main
27/11/2022 Page No. 8

सकाळ



**फलटण : १९ वर्षांखालील मुलांच्या बॉल बॅडमिंटन स्पर्धेतील विजेता दहिवडी कॉलेज दहिवडीचा संघ. (रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा**)**

# दहिवडी कॉलेजला विजेतेपद

**दहिवडी, ता. १ :** जिल्हा क्रीडा कार्यालय सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत गाडगे महाराज आश्रमशाळा, खराडेवाडी (ता. फलटण) येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या गटात दहिवडी कॉलेज दहिवडी संघाने प्रथम क्रमांक पटकावला. १९ वर्षांखालील अंतिम सामना दहिवडी कॉलेज दहिवडी विरुद्ध संत गाडगे महाराज आश्रमशाळा खराडेवाडी, फलटण यांच्यात झाला. या सामन्यात दहिवडी कॉलेज संघाने २१-१२, २१-१८ अशा गुणांनी विजय प्राप्त केला. सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी दहिवडी संघाची निवड झाली. या संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा. अमर जाधव यांनी काम पाहिले. विजेत्या संघाचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख, प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नंदकुमार खोत आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.

Satara, Satara-Today
02/12/2022 Page No. 2

पुण्य नगरी

# दहिवडी कॉलेजमध्ये संविधान दिन साजरा

**बिदाल / प्रतिनिधी**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेज मध्ये दि. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन निवडणुक साक्षरता मंडळ, राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रिय सेवा योजना विभाग, समान संधी केंद्र व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या वेळी उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, पर्यवेक्षक प्रा. आर. डी. शिर्के, डॉ. विलास कांबळे, कार्यालय अधिक्षक केशव औटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भारतीय संविधानाच्या सरनाम्याचे सामुहिक वाचन करण्यात आले. कु. काजल शिलवंत या विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना उपप्राचार्य डॉ. बरकडे म्हणाले, भारतीय संविधानाने भेदभाव व विषमता नष्ट करून सामाजिक न्याय प्रस्थापित केला आहे.



दहिवडी : दहिवडी कॉलेजमध्ये संविधान कार्यक्रम प्रसंगी शिक्षक व विद्यार्थी. (छाया : उमेश बुधावले)

प्रत्येक प्रौढ नागरीकाला मतदानाचा हक्क दिल्याने व्यक्तीप्रतिष्ठा हे मूल्य संवर्धन होत आहे. तसेच लोकशाही शासन प्रकारामुळे प्रत्येक नागरिकाला राजकीय न्यायाची संधी उपलब्ध असते, प्रत्येकाने लोकशाही मूल्यांचे संवर्धन केले पाहिजे.

प्रस्ताविक प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी केले, तर प्रा. के. एस. शिंदे यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल विष्णू वाघेरे, प्रा. विक्रम लांडगे, प्रा. एम. बी. पाटील, प्रा. एस. जी. गायकवाड, परवेज मुलाणी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Smart Satara Edition
Dec 3, 2022 Page No. 04
Powered by : eReleGo.com

सकाळ

# मतदार नोंदणीत सहभागी व्हा : व्हट्टे

**दहिवडी, ता. ५ :** निवडणूक आयोगाने ऑनलाइन व ऑफलाइन अशा पद्धतीने मतदार नोंदणीचे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. त्यापैकी जे शक्य आहे, त्या पर्यायानुसार अर्ज करून १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येकाने मतदार म्हणून नावनोंदणी करावी, असे आवाहन माणचे तहसीलदार श्रीशैल व्हट्टे यांनी केले.



**दहिवडी : मतदार नोंदणी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्रीशैल व्हट्टे. उपस्थित मान्यवर.** (**रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

येथील दहिवडी कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभाग, निवडणूक साक्षरता मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, समान संधी केंद्र व निवडणूक शाखा तहसील कार्यालय दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मतदार नोंदणी कार्यशाळेत' ते बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. ए. जे. बरकडे, डॉ. ए. एन. दडस, डॉ. शिवशंकर लेकुरवाळे, नायब तहसीलदार अंकुश इवरे उपस्थित होते.

कार्यशाळेत महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना नितीन सावंत यांनी ऑनलाइन मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत प्रशिक्षण दिले. नव मतदारांची मोठ्या संख्येने नोंदणी करण्यात आली.प्रा. भक्ती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. के. एस. शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर काकडे, उषा साबळे, युवराज खाडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेस शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

» सकाळ कनेक्ट

फुल स्टॅक डेव्हलपमेंट वेबिनार

Satara, Satara-Today
06/12/2022 Page No. 4



दहिवडी : प्रशांत पोद्दार यांचा सन्मान करताना दहिवडी कॉलेजचे प्राचार्य डॉ. साळुंखे व इतर. (छाया : प्रविण राजे)

# विवेक वाहिनी समाज प्रबोधनाचे साधन : पोतदार

## विवेक वाहिनीचे दहिवडी महाविद्यालयात उद्घाटन

**दहिवडी, दि. ८ (प्रतिनिधी)** - अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विवेक वाहिनी ही समाज प्रबोधन व वैज्ञानिक दृष्टीकोन रुझविण्याचे साधन असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे जनरल सेक्रेटरी प्रशांत पोतदार यांनी केले. ते येथील दहिवडी महाविद्यालयातील विवेक वाहिनी समिती व राष्ट्रीय सेवा योजना आयोजित विवेक वाहिनी उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, प्रा. के. एस. शिंदे, मुनिल रणदिवे, प्रा. हनुमंत कायंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना पोतदार म्हणाले, आपला विकास आपल्या हाती, हक्क हवे तर कर्तव्य आधी हे विवेक वाहिनीचे बोधवाक्य आहे. नियमित व्यायाम व सकस आहार, वैचारिक वाचन, स्वतः निर्व्यसनी असणे, खादीचा वापर व अन्य धर्मियांशी जाणीवपूर्वक समाजात भोंदूगिरीच्या माध्यमातून चालणारी फसवेगीरी श्री. पोतदार यांनी विविध प्रात्यक्षिके करून दाखविली. अंधश्रद्धा मुक्त समाज निर्मितीसाठी शिक्षणाबरोबरच चिकित्सक बुद्धी व मानसिक तयारी सुद्धा खूप महत्वाची आहे. महाविद्यालयीन युवक, युवतींना विवेक वाहिनीच्या माध्यमातून समाज प्रबोधनाच्या कार्यात सक्रीय होण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. साळुंखे म्हणाले, विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन व अंधश्रध्दा मुक्त समाज निर्माण करण्याचे कार्य विवेक वाहिनीच्या माध्यमातून करण्यात येते. डॉ. नरेंद्र दाभोळकर व डॉ. एन.डी.पाटील यांचा वैचारिक वारसा पुढे नेण्याचे कार्य विवेक वाहिनी करत आहे. विवेक वाहिनीच्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाच्या कार्यात प्रत्येकाने योगदान द्यावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भक्ती पाटील यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी केले, तर आभार डॉ. आनंद देडे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका,

सकाळ

# दहिवडी कॉलेजमध्ये आज पुस्तक प्रकाशन

**दहिवडी :** प्रा. नवनाथ लोखंडे लिखित 'महाराष्ट्राला न समजलेले शरद पवार' या पुस्तकाचे प्रकाशन खासदार श्रीनिवास पाटील, रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख यांच्या हस्ते उद्या (सोमवार) दुपारी ३ वाजता येथील दहिवडी कॉलेज येथे होईल. यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे यांचे व्याख्यान होणार आहे. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या वतीने कृतज्ञता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाच्या समारोपानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी दिली. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अमित सोनावणे यांची उपस्थिती राहील. यावेळी कृतज्ञता सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या वक्तृत्व, निबंध व रांगोळी स्पर्धेतील बक्षिसांचे वितरण तसेच कॉलेजमधील 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थी, विद्यार्थिनींना मोफत गणवेशवाटप करण्यात येणार आहे.

Satara, Satara-Today
12/12/2022 Page No. 3

सकाळ

# शरद पवारांचे व्यक्तिमत्त्व सर्वव्यापी : देशमुख

**दहिवडी, ता. १४ :** शरद पवार यांचे व्यक्तिमत्त्व सर्व क्षेत्रांना व्यापून टाकणारं आहे. राजकारणापेक्षा संवेदनशील माणूस म्हणून ते खूप मोठे आहेत. सहकाऱ्यांची आस्थेने विचारपूस करण्याचा मोठेपणा त्यांच्यात आहे, असे मत निवृत्त सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख यांनी व्यक्त केले.



**दहिवडी : प्रा. नवनाथ लोखंडे लिखित 'महाराष्ट्राला न समजलेले शरद पवार' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रभाकर देशमुख, विजय चोरमारे आदी मान्यवर.** (**रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

प्रा. नवनाथ लोखंडे लिखित 'महाराष्ट्राला न समजलेले शरद पवार' या पुस्तकाचे प्रकाशन रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अमित सोनवणे, एम. के. भोसले, प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, प्राचार्य बबन खाडे, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. जे. बरकडे, उपप्राचार्या नंदिनी साळुंखे, पंढरपूरचे माजी सभापती वामनराव महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. नवनाथ लोखंडे म्हणाले, शरद पवार यांच्या जीवन प्रवाहातील महत्त्वपूर्ण घटनांचा उल्लेख या पुस्तकात आहे.

ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचा वारसा यशवंतराव चव्हाणांनी पुढे चालविला. तोच वारसा पुढे चालवत यशवंतराव चव्हाणांच्या इतकंच तोलामोलाचं काम शरद पवार यांनी केले.

यावेळी कृतज्ञता सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व, निबंध व रांगोळी स्पर्धेतील बक्षिसांचे वितरण तसेच कॉलेजमधील 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना मोफत गणवेशवाटप करण्यात आले.

प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. इंद्रजित ऐवळे व प्रा. दत्तात्रय मांजरे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. अवी कोपर्डे यांनी आभार मानले.

Satara, Main
15/12/2022 Page No. 3